मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
कार्यकारी अभियंता/ग-उत्तर विभाग यांचे कार्यालय,
दुसरा मजला, सनशाईन प्लाझा, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग, दादर (पुर्व), मुंबई- ४०००१४

जा.क्र. का.अ./ग-उत्तर / उवि-४/DIS- /२०२६
दिनांक :-

## म्हाड अधिनियम १९७६ मधील कलम ७७(ब) अंतर्गत धोक्याचे सूचनापत्र

प्रति,

**सर्व भाडेकरु/ रहिवाशी**
इमारत क्र. २० जमाल हाउुस, दर्गा स्ट्रिट माहिम, मुंबई -१६ उपकर क्रमांक GN- ५२९०

**मालक**
COURT RECEIVER, HIGH COURT,
SUIT NO. ४८८९ OF २००२ BANK OF INDIA BLDG.,२ND FLR M. G. ROAD,FORTMUMBAI-४०० ०२३.

**विषय** :- उपकरप्राप्त 'इमारत क्र. इमारत क्र. २० जमाल हाउुस, दर्गा स्ट्रिट माहिम, मुंबई -१६ च्या धोकादायक संरचनात्मक स्थितीबाबत इशारा सूचना उपकर क्रमांक GN- ५२९०

**संदर्भ** :- १) मेसर्स डिझाइन ग्रुप यांनी या कार्यालयास दि.२३.०२.२०२६ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेला संरचनात्मक परिक्षण अहवाल.
२) या कार्यालयाचे धोक्याचे सूचनापत्र क्र. DIS-१३९००२५/२०२६ दि.२५.०५.२०२६.
३) Propping / Demolition work order letter No.१३६८६३७ दि. ०७.०५.२०२६.

महोदय/ महोदया,

या कार्यालयातर्फे विषयांकित इमारतीचे आर्कीटेक मे. श्री.साईसागर आर्किटेक श्री.राजन बागवे यांनी संरचनात्मक परिक्षण केले आहे. त्याअनुषंगाने मेसर्स डिझाइन ग्रुप यांनी संदर्भाधिन पत्रान्वये संरचनात्मक परिक्षण अहवाल या कार्यालयास सादर केला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने विषयांकित इमारतीची वर्गवारी **C-2A** म्हणजेच **To be Evacuated partial demolition required major structural repair** अशी नमूद करण्यात आली आहे. सदर इमारतीच्या दुरुस्तीकरीता रु. ९,८७,५२२/- अतिरीक्त रक्कम दि.१५.०६.२०२२ रोजी कळविण्यात आली होती. त्या रक्कमेचा भरणा आपल्याकडुन करण्यात आला नसल्याने सदर इमारतीची सदयस्थितीत दुअवस्था झाली आहे. या कार्यालयाने सदर बाबी लक्षात घेडुन टेकु लावणे व पाडकामाकरीता कार्यादेश दिले आहेत. सबब आपणास या सूचना पत्रान्वये विषयांकित इमारतीच्या धोकादायक संरचनात्मक स्थितीबाबत इशारा देण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी आपणास सूचित करण्यात येते कि, विषयांकित इमारतीत वास्तव्य करणे धोकादायक असून आपण आपली सदनिका तातडीने रिक्त करुन इमारत निष्कासित करावी. आपणास पर्यायी निवासस्थानासाठी म्हाडाच्या संक्रमण शिबीरातील गाळ्याची आवश्यकता असल्यास आपण या कार्यालयास खालील नमूद कागदपत्रांच्या मूळ प्रती व त्यांच्या छायांकित प्रतींचे दोन संच तसेच सोबत आपली पासपोर्ट आकाराची ०८ छायाचित्रे या कार्यालयास सादर करावीत, जेणेकरुन आपणास संक्रमण शिबीरातील गाळा उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक ती प्रक्रिया सुरु करणे या कार्यालयास शक्य होईल.

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशील | शेरा |
|---|---|---|
| १. | भाडेपावती - दि.१३.०६.१९९६ पूर्वीची व सध्याची | सदर कागदपत्रे विषयांकित इमारतीत आपण वास्तव्यास असलेल्या गाळ्याशी संबंधित असणे आवश्यक आहे. |
| २. | शिधापत्रिका - दि.१३.०६.१९९६ पूर्वीचे | |
| ३. | निवडणूक ओळखपत्र - दि.१३.०६.१९९६ पूर्वीचे | |
| ४. | विद्युत देयक - दि.१३.०६.१९९६ पूर्वीचे व सध्याचे | |
| ५. | दुरध्वनी देयक - दि.१३.०६.१९९६ पूर्वीचे व सध्याचे | |
| ६. | आधारकार्ड व पॅनकार्ड | |

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशील | शेरा |
|---|---|---|
| ७. | पारपत्र / वाहन चालक परवाना, इत्यादी. | |
| ८. | इमारतीतील वास्तव्याबाबतचे इतर पुरावे | |

उपरोल्लेखित बाबींची पूर्तता करुन आपण आपला गाळा निष्कासित करुन इतरत्र स्थलांतरीत झाला नाहीत व इमारतीत आपले वास्तव्य सुरु ठेवलेत आणि त्या कालावधीत इमारतीत पडझडीने अपघात घडून जीवित अथवा वित्त हानी झाल्यास, त्यास सर्वस्वी आपण जबाबदार रहाल याची आपण **गांभिर्याने** नोंद घ्यावी.

आपला विश्वासू ,

**कार्यकारी अभियंता**
ग-उत्तर विभाग / मुं.इ.दु व पु.मंडळ

**प्रत,**

- मा.मुख्य अधिकारी/ मुं.इ.दु व पु.मंडळ यांस माहितीस्तव सविनय सादर.
- उपमुख्य अभियंता (परिमंडळ-४) / मुं.इ.दु व पु.मंडळ यांस माहितीस्तव सादर.
- उपमुख्य अधिकारी (सं.गा.) / मुं.इ.दु व पु.मंडळ यांस माहितीस्तव सस्नेह अग्रेषित.
- सहाय्यक आयुक्त, जी नॉर्थ-विभाग, मनपा, यांस माहितीस्तव सस्नेह अग्रेषित.
- वरिष्ठ पोलिस निरिक्षक, माहिम पोलिस ठाणे यांस माहितीस्तव रवाना.
- वरिष्ठ अग्निशमन अधिकारी, दादर अग्निशमन केंद्र यांस माहितीस्तव रवाना.
- मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी/ प्राधिकरण यांस माहितीस्तव तथा म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेकामी रवाना.
- मुख्य जनसंपर्क अधिकारी/ प्राधिकरण यांस माहितीस्तव तथा सदर सूचनापत्र मराठी व इंग्रजी वृत्तपत्रात प्रसिद्ध करणेकामी रवाना.
- इमारतीच्या दर्शनी भागावर चिकटविणेसाठी
  - इमारतीच्या घरमालकाची नोंद या कार्यालयात उपलब्ध असलेल्या अभिलेखाच्या अनुषंगाने नमूद करण्यात आलेली आहे. तथापि सदर नोंदीव्यतिरिक्त इमारतीच्या मालकीचे अन्य दावेदार असल्यास त्यांनी व इमारतीच्या सर्व भाडेकरु/ रहिवाशी यांनी सदर धोक्याच्या सूचनेची दखल घेणेकामी या नोटीशीच्या प्रती पंचनाम्यासहित इमारतीच्या दर्शनी भागावर चिकटविण्यात येत आहेत.